**Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education**
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ**
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000
Email : secretary.stateboard@gmail.com

क.रा.मं./परीक्षा–३/ 1861
पुणे – ४११००४
दि.०४/०५/२०२६

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय:– जून–जुलै २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांबाबत..

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रु.–मार्च २०२६ परीक्षेचा निकाल दिनांक ०२/०५/२०२६ रोजी ऑनलाईन जाहीर झालेला असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे पुरवणी परीक्षा जून–जुलै २०२६ मध्ये घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (फेब्रु.–मार्च २०२६ परीक्षेस प्रविष्ट न झालेले),व जुलै–ऑगस्ट २०२६ परीक्षेसाठी नावनोंदणी केलेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या, **ITI** विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे **Transfer of Credit** घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत. सदर परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने इयत्ता १२वी साठी **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे –

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी **RTGS/NEFT** द्वारे रक्कम भरावयाची तारीख | उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी **RTGS/NEFT** पावती/ चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | मंगळवार, दिनांक ०५/०५/२०२६ ते शुक्रवार, दिनांक १५/०५/२०२६ | गुरूवार दि.२१/०५/२०२६ पर्यंत | सोमवार दि.२५/०५/२०२६ |
| विलंब शुल्क | शनिवार, दिनांक १६/०५/२०२६ ते बुधवार, दिनांक २०/०५/२०२६ | | |

सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन **SUBMIT** केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कॉलेज लॉगिन **(College Login)** मधून **Pre-List** उपलब्ध करुन दिलेली असेल, कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत उच्च माध्यमिक शाळा प्रमुख/प्राचार्य यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.

..२..

इ. १२ वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्त्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहेत –

१ ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना फेब्रु.–मार्च २०२६ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची त्या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.

२ श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अटी व शर्तीनुसार श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या फेब्रु.–मार्च २०२६ परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी जून–जुलै २०२६, फेब्रु–मार्च २०२७ व जून–जुलै २०२७ अशा लगतच्या तीन संधी उपलब्ध राहतील, याची नोंद घ्यावी.

३ सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळाच्या अधिकृत **Website** द्वारे प्राप्त **Online** चलनावर नमूद केलेल्या **ICICI** बँकेच्या **Virtual Account** मध्ये कोणत्याही बँकेमधून **NEFT/RTGS** द्वारे चलनाप्रमाणे अचूक शुल्क रकमेचा भरणा करण्यात यावा व चलनाची प्रत व **Pre-list** विहित मुदतीमध्ये विभागीय मंडळास जमा करावे. रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामध्ये समाविष्ट सर्व विद्यार्थ्यांच्या **application status** मध्ये **" Draft"** चा **"Send to Board"** व **Payment status** मध्ये **"Not Paid"** चा **"Paid"** असा बदल आला आहे का याची खातरजमा करावी. अशा **"Send to Board"** व **"Paid" Status** प्राप्त झालेली आवेदनपत्रे मंडळास प्राप्त झाले असे गृहीत धरून त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल व उर्वरित आवेदनपत्रे **Draft Mode** मध्येच राहतील व त्याबाबत कोणतीही कार्यवाही होणार नाही.

४ यापूर्वी वापरात असणाऱ्या **Bank Of India/ HDFC Bank/Axis Bank** च्या जुन्या चलनांचा वापर करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे मंडळात रोख स्वरूपात शुल्क स्विकारले जाणार नाही.

५ शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांना भरलेल्या आवेदनपत्रांमधून निवड करून एक किंवा एकापेक्षा अधिक चलने तयार करता येतील. परंतु शुल्काचा भरणा करताना प्रत्येक चलन स्वतंत्रपणे भरण्यात यावे. जेणेकरून त्यात समाविष्ट विद्यार्थ्यांचे **Status Update** होईल.

६ परीक्षा शुल्क **NEFT/ RTGS** द्वारे भरणा केल्यानंतर सदर शुल्क पुनःश्च शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या खात्यावर जमा झालेले नाही व ते मंडळाच्या खात्यावर जमा/वर्ग झालेले आहे याची खात्री करावी. **NEFT/ RTGS** परत शाळेच्या खात्यात जमा झाल्याप्रकरणी मंडळास पुनःश्च परीक्षा शुल्क भरणा ज्या दिनांकास करण्यात येईल, तो दिनांक परीक्षा फी भरणा दिनांक म्हणून ग्राह्य धरण्यात येईल, त्या दिनांकाच्या विलंब अथवा अतिविलंब शुल्कासह परीक्षा फी भरावी लागेल,याची नोंद घ्यावी.

७ उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर केलेल्या सर्व आवेदनपत्रांचे विहीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांची प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत.

८ नियमित व विलंब शुल्काने आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

९ अतिविलंब शुल्काने आवेदनपत्रे भरण्याच्या तारखा यथावकाश कळविण्यात येतील.

उपरोक्त सर्व बाबी आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

(मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने)

Mali

(डॉ. दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे –४

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –

१. व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे.
२. समन्वयक ऑनलाईन विभाग, राज्यमंडळ, पुणे.
३. लेखाधिकारी, राज्य मंडळ, पुणे.
४. अस्वीस, सस्वीस, राज्य मंडळ, पुणे.
५. रोखपाल, लेखा शाखा, राज्य मंडळ व सर्व विभागीय मंडळे.